


# पारनेर दर्शन





वर्ष १ अंक १४०, रविवार ११ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# विरोधकांचे दुसऱ्याच्या झेंड्यावर पंढरपुर!

■ आ. नीलेश लंके यांचे खा. सुजय विखे यांच्यावर टिकाश्र

■ सावरगांव येथे ४ कोटी रूपयांच्या विकास कामांचे भुमिपूजन



■ सावरगांव येथील विविध विकास कामांचा आ. नीलेश लंके यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

सावरगांव : प्रतिनिधी

**पाच वर्षाच्या कालखंडात एक रूपयाचेही विकास काम न करता काही लोक दुसऱ्याच्याच झेंडयावर पंढरपुर करीत असून जनता त्यांचा कधीही स्विकारणार नाही अशी टीका आमदार नीलेश लंके यांनी खा. डॉ. सुजय विखे यांचे नाव न घेता केली. सावरगांव येथील विविध विकास कामांचे आ. लंके यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.**

यावेळी बोलताना आ. लंके म्हणाले, सावरगांवकरांनी मला भरभरून प्रेम दिले असून त्या प्रेमातून उतराई करण्यासाठी मी प्रयत्नशिल आहे. आतापर्यंत सावरगांला आठ कोटींची विकास कामे देण्यात आली असून यापुढील काळातही विकास कामांसाठी मी कटीबध्द राहिल. विरोधक काय बोलतात याकडे दुर्लक्ष करा, काम करणाऱ्या माणसाच्या पाठीमागे खंबिरपणे उभे रहा असे आवाहन त्यांनी केले.

आ. लंके पुढे म्हणाले, मी काम करणारा माणूस आहे. कामे पुर्ण करून मी समाजापुढे जातो. दिलेला प्रत्येक शब्द मी पाळतो. सर्वसामान्य जनता हीच माझी खरी ताकद असल्याचे नमुद करतानाच काही लोकांचे एक रूपयांचेही काम नाही, दुसऱ्याच्याच झेंडयावर ते पंढरपुर करीत असल्याची टीका त्यांनी केली.

यावेळी बोलताना जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर म्हणाले, आ. नीलेश लंके यांनी गेल्या साडेचार वर्षांच्या कालखंडात विकास कामांचा डोंगर उभा केला असून त्यांची विकास कामे हीच विरोधकांची पोटदुखी आहे. प्रत्येक गावामध्ये कोटयावधी रूपयांची विकास कामे मार्गी लागल्याने जनतेमध्ये समाधानाचे वातावरण असून संपूर्ण मतदारसंघ आ. लंके यांच्या पाठीशी खंबिरपणे उभा आहे. आगामी निवडणूकीत आ. लंके हे विक्रमी मतांनी विजयी होतील असा विश्वास भालेकर यांनी व्यक्त केला.

यावेळी मा. सभापती गंगराम बेलकर, शिवाजीशेठ बेलकर, दिपक लंके प्रकाश गाजरे, सत्यम निमसे, बाळासाहेब खिलारी, संदीप चौधरी, रविंद्र राजदेव, रामभाऊ दादा थोरात, रविंद्र गायखे, नवनाथ गांजे, पोपटशेठ चिकणे, सरपंच पर्वती चिकणे, उपसरपंच प्रदीपशेठ गुगळे, सुभाषशेठ गुगळे, चेअरमन साहेबराव चिकणे, रणधिर शिंदे, नितिन चिकणे, शंकर चिकणे, सचिन गोडसे, इंद्रवन माने, विजय चिकणे, दादाभाउ चिकणे, शिवाजी शेळके, शिवाजी शिंदे, दत्तात्रेय पोपळघट, जालिंदर गांजे, विठठल माने, शिवम बेलकर यांच्यासह ग्रामस्थ यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते. प्रमोद गुगळे यांनी सुत्रसंचलन तर सरपंच पर्वती चिकणे यांनी आभार मानले.

### समाजसेवक, आरोग्यदुत आणि विकास पुरूष

**जनतेची सेवा करताना आ. लंके हे समाजसेवक झाले. कोरोना संकटात कोरोना रूग्णांची सेवा करताना आरोग्यदूत झाले तर मतदार संघात१ हजार ८०० कोटींची विकास कामे करीत ते विकास पुरूष झाले आहेत. लोकप्रतिनिधी कसा असावा हे आ. लंके हे उत्तम उदाहरण आहे.**

**अर्जुन भालेकर**
जिल्हा उपाध्यक्ष
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी

# अणणांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्यांना धडा शिकवा

■ विक्रमसिंह कळमकर यांचे सभासदांना आवाहन ■ परिवर्तनासाठी माजी सैनिक एकवटले

पारनेर : प्रतिनिधी

**अठरा वर्षांपासून शिवाजी व्यवहारे सैनिक बँकेत पदावर असून त्यांनी व मुख्यकार्यकारी आधिकारी संजय कोरडे या जोडीने संचालक,कर्मचारी यांचा वेळोवेळी फक्त वापर करत गैरव्यवहार केला आहे. बँकेच्या प्रगतीस खोडा घालणाऱ्या शिवाजी व्यवहारे यांना बँकेतून दूर ठेवण्यासाठी सभासद या निवडणुकीत आमच्या पॅनेलच्या सर्व उमेदवारांना निवडून देऊन परिवर्तन नक्की करतील, असा ठाम विश्वास पॅनेल प्रमुख विक्रमसिंह कळमकर यांनी व्यक्त केला.**



**अणणांची क्लिप व्हायरल!**

बँकेत अनेक वर्षांपासून ठाण मांडलेल्या शिवाजी व्यवहारे यांनी बँकेत गैरव्यवहार केल्याने ५ गुन्हे दाखल आहेत तर सहकार खात्याचा चौकशीचा ससेमिरा चालू असून कलम ८८ ची कारवाई चालू आहे. असे असताना माझा फोटो छापू नये. मी बँकेच्या उन्नती बाबत खूप स्वप्न पाहिले होते मात्र ते स्वप्न व्यवहारेंमुळे भंगले. - अणणा हजारे


**माजी सैनिक एकवटला!**


सैनिक बँकेचे माजी चेअरमन अर्जुन चौधरी यांच्या सह पारनेर तालुक्यातील माजी सैनिकांनी परिवर्तन पॅनलला पाठिंबा दिला असून सर्व सभासद बँक चेअरमन शिवाजी व्यवहारे यांची बँकेतील हुकूमशाही हद्दपार करतील .
अर्जुन चौधरी, माजी चेअरमन

**परिवर्तन पॅनलला वाढता पाठिंबा**

सभासदांनी यावेळी उर्वरीत पान ४ वर



# शिवार

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती


## चाऱ्यावर प्रक्रिया करा

# पौष्टिकता वाढवा!



**जानेवारीपासून जुलैपर्यंत बहुतांश जनावरांना केवळ सुक्का चारा दिला जातो. हा सुक्का चारा निकृष्ट दर्जाचा, बेचव आणि पचण्यास कठीण असतो. उदा. कडबा, सोयाबीन भुसकट, गुळी असा चारा पशू आहारात वापरल्यास जनावरांचे आरोग्य बिघडते, त्याचबरोबर उत्पादनही घटते, प्रजनन क्रियेत अडथळे येतात. हे लक्षात घेऊन उन्हाळ्यामध्ये जनावरांच्या आहाराबाबत जागरुकता बाळगणे आवश्यक आहे. कोरडवाहू शेती असेल तर वर्षभर हिरव्या चाऱ्याचे उत्पादन घेणे शक्य होत नाही. बहुतांशी पशुपालक हे १ ते २ जनावर संगोपन करून व्यवसाय करतात. मुरघास प्रक्रियेद्वारेसुद्धा हिरव्या चाऱ्याची साठवणूक करतात. परंतु तरीही जनावरांची चाऱ्याची गरज पूर्ण होत नाही. त्यासाठी चाऱ्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे.**

## चाऱ्याची कुट्टी करा...



चारा आहे त्या स्वरूपात कुट्टी न करता दिल्यास बराचसा (४० ते ५० टक्के) चारा पाचटासोबत वाया जातो. कुट्टी न केलेला चारा पचण्यासाठी जड असतो. असा चारा खाण्यासाठी, चावण्यासाठी जनावरांची जास्तीची ऊर्जा वाया जाते म्हणून चारा कुट्टी करूनच द्यावा. हा चारा जनावरे आवडीने खातात. कमी जागेत जास्त चारा साठवता येतो. चारा कुट्टीमुळे सर्व चारा खाल्ला जातो. कमी चाऱ्यामध्ये जनावरांचे संगोपन करता येते. शेतातील दुय्यम पदार्थ कुट्टी करून काही प्रमाणात उपलब्ध चांगल्या चाऱ्यासोबत मिसळून वापरता येतात. वाळलेला चारा हा चवहीन, खाण्यास कठीण असतो. त्यामध्ये पोषणतत्त्वे ही कमी प्रमाणात असतात म्हणून अशा चाऱ्यामधून जनावरांचे पोषण करण्यासाठी त्यावर प्रक्रिया गरजेचे आहे. यामध्ये गूळ आणि मिठाची प्रक्रिया, मळी आणि युरिया किंवा गूळ आणि युरियाची प्रक्रिया करता येते.

## चाऱ्यावर गूळ आणि मिठाची प्रक्रिया

प्रक्रिया करताना १०० किलो चाऱ्यासाठी १ किलो गूळ आणि १ किलो मीठ २० ते २५ लिटर पाण्यामध्ये मिसळून द्रावण तयार करावे. हे द्रावण शंभर किलो चाऱ्यावर समप्रमाणात फवारावे. हा चारा १२ ते २४ तास झाकून ठेवून नंतर जनावरांच्या आहारात वापरावा. या प्रक्रियेमुळे चारा मऊ होतो. चव वाढल्यामुळे असा चारा जनावरे आवडीने खातात. उन्हाळ्यामध्ये जनावरांना दररोज ३० ग्रॅम मीठ आणि १०० ते १५० ग्रॅम गूळ दिल्यास तात्काळ ऊर्जा मिळून जनावर तरतरीत राहते. जनावरांच्या शरीरावर ताण येत नाही.

## युरिया आणि मळी किंवा युरिया आणि गुळाची प्रक्रिया

निष्कृष्ट चाऱ्याचा वापर जनावरांच्या आहारात होत असेल तर त्यातून पोषणतत्त्वे गरजेनुसार जनावरांना मिळत नाहीत म्हणून अशावेळी चाऱ्याची पचनीयता, खाण्याचे प्रमाण वाढण्यासाठी युरिया आणि मळी किंवा युरिया आणि गुळाची प्रक्रिया करावी. १०० किलो निकृष्ट चाऱ्यासाठी ४ किलो युरिया, ४ किलो गूळ किंवा १० किलो मळी, १ किलो मीठ आणि १ किलो क्षारमिश्रण ४० ते ५० लिटर पाण्यामध्ये विरघळून घ्यावे. चाऱ्याचा जमिनीवर किंवा प्लास्टिकवर ४-४ इंचाचा थर तयार करून त्यावर हे तयार केलेले द्रावण समप्रमाणात फवारावे. फवारलेला चारा २१ दिवस हवाबंद स्थितीत झाकून ठेवावा. २१ दिवसानंतर चारा जनावरांना खाण्यास द्यावा. चारा खाण्यास देण्यापूर्वी दोन तास हवेत उघडा ठेवावा. जेणेकरून त्यातील जास्तीचा अमोनिया निघून जाईल. असा प्रक्रिया केलेला चारा ४ ते ८ किलो एका जनावरास याप्रमाणे द्यावा. सहा महिने वयाच्या आतील जनावरांना असा प्रक्रिया केलेला चारा खाण्यास देऊ नये. असा चारा देतेवेळस मुबलक पिण्याच्या पाण्याची सोय असावी. जनावरांच्या आहारात पशूतज्ज्ञांच्या सल्ल्याने वापर करावा.

### क्षारमिश्रण

- उन्हाळ्यामध्ये सकस आणि गरजेनुसार चाऱ्याच्या कमतरतेमुळे दुधाळ जनावरांमध्ये विशेषतः म्हशीमध्ये उरमोडी हा आजार जास्त दिसतो. केवळ सुक्या चाऱ्याच्या पुरवठ्यामुळे जनावरामध्ये फॉस्फरसची कमतरता होते. त्यामुळे जनावरे चप्पल, दगड, दोरी, प्लास्टिक आदी अखाद्य वस्तू खातात. यामुळे जनावर दगावण्याची, निकामी होण्याची शक्यता असते.
- चाऱ्याच्या कमतरतेमुळे बरेचसे आजार उद्भवतात. हे टाळण्यासाठी ज्या ज्या वेळी केवळ सुक्का चारा आहारात आहे, त्या वेळी आहारात क्षारमिश्रणाचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. वेगवेगळ्या कंपन्यांचे क्षारमिश्रण बाजारामध्ये उपलब्ध आहेत. त्यातील चांगल्या प्रतिचे तसेच आवश्यक घटक असणारे क्षारमिश्रण रोज वापरावे. उन्हाळ्यात शक्यतो चिलेटेड क्षारमिश्रणाचा जनावरांच्या आहारात पशूतज्ज्ञांच्या सल्ल्याने वापर करावा.

### फायदे कोणते?

चाऱ्याची चव वाढते. खाण्याचे प्रमाण वाढून चाऱ्याचा अपव्यय टाळला जातो.पचनीयता वाढते. प्रथिनांचे प्रमाण वाढते. कमी चाऱ्यात जनावरांचे पोषण करता येते.

### बायपास फॅट, बायपास प्रथिनांचा वापर


उन्हाळ्यात वाळल्या चाऱ्यामधून जनावरांना हवी तेवढी ऊर्जा आणि प्रथिने मिळू शकत नाहीत. दूध उत्पादनात घट होते हे टाळण्यासाठी कमी खाद्यातून ऊर्जा आणि प्रथिने मिळवण्यासाठी बायपास फॅट आणि बायपास प्रथिनांचा आहारात वापर करावा.

### जनावरांसाठी पाणी

वाढत्या तापमानामुळे जनावरांची पाण्याची गरज वाढते. या काळात पाणी कमी पडल्यास उष्माघाताने जनावरे दगावू शकतात. या काळात जनावरांसाठी २४ तास थंड, स्वच्छ पाण्याची सोय करावी.



## सुबाभळीच्या चाऱ्याचे हवे योग्य प्रमाण



सुबाभूळ हे विविधोपयोगी बहुवर्गीय द्विदल प्रकारातील झाड आहे. द्विदल चारा पिके ही प्रथिने व खनिजांनी संपन्न असतात. पशुखाद्यात द्विदल पिकांच्या चाऱ्याचा समावेश केल्याने जनावरांना सकस खाद्य मिळते. खुराकाचे प्रमाणही कमी करता येते. त्यामुळे खुराकावरील खर्च कमी होतो. सुबाभळीच्या बियादेखील पशुखाद्य म्हणून वापरता येतात. परंतु याचे प्रमाण पशू तज्ज्ञांच्या सल्ल्याने ठरवावे. हे झाड वारा प्रतिबंधक व कुंपण म्हणून उपयुक्त आहे. त्याच्या लागवडीमुळे जमीन आच्छादली जाऊन धूप थांबते. साल्वाडोर प्रकारची सुबाभळीची झाडे हवाईन प्रकारापेक्षा दुपटीने पाने देतात. ही पाने पशुखाद्यामध्ये वापरता येतात. डोंगरावर व उतार असलेल्या उंच जागी सुबाभळीची झाडे चर खणून त्यात लावावीत. उतारावर ४० ते ५० सेंटिमीटर खोल चर खणून त्यात एक मीटर अंतरावर खड्डे खणून रोपे लावावीत. दोन चरांमधील अंतर साधारणतः ३ ते ४ मीटर असावे. सुबाभळीसाठी चाऱ्यासाठी पहिली कापणी ५ ते ६ महिन्यांनी मिळते. सर्वसाधारण पीक दीड ते दोन मीटर वाढले असता पहिली कापणी जमिनीपासून ६० सेंटिमीटर उंचीवर करावी. दुसरी व तिसरी कापणी १० सेंटिमीटर उंचीवर ४० ते ५० दिवसांनी करावी. नंतरच्या कापण्या पिकाची ९० सेंटिमीटर उंची कायम ठेवून ३५ ते ४० दिवसांच्या अंतराने कराव्यात. योग्य मशागत व देखरेखीखालील पूर्ण वाढ झालेल्या चांगल्या पिकापासून हेक्टरी ५० टन वैरणीचे उत्पादन वर्षाला मिळते.

### घ्यावयाची काळजी...

सुबाभळीची फक्त पाने न तोडता ती फांदीसह तोडावीत. त्यांचे तुकडे करून जनावरांच्या चारा मिश्रणात वापरावीत. सुबाभळीची पाने ही भाताचा पेंढा, नागली काड, कडबी यांसारख्या वाळलेल्या वैरणीसोबत मिसळून द्यावीत. सुबाभूळच्या चाऱ्याची सर्व मात्रा एकाच वेळी न देता दिवसातून २ ते ३ वेळा विभागून द्यावी. सुबाभळीची पाने चाऱ्याच्या खाद्य मिश्रणात देण्यापूर्वी पशू तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

## गाभण शेळ्यांची काळजी घेताना...

**शेळीपालनाचे उत्पन्न कळपामध्ये जन्माला येणाऱ्या करडांवर अवलंबून असते. त्यासाठी शेळी गाभण असणे आवश्यक आहे. दोन वर्षाला तीन वेळेस शेळी व्यायली पाहिजे. शेळीपालन व्यवसायात संगोपनाला जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व गाभण शेळीच्या आरोग्य व व्यवस्थापनेला सुद्धा आहे.**



### गाभण शेळ्यांची लक्षणे

एक वेळ गाभण गेलेली शेळी पुढील २१ दिवसांत परत माजावर येत नाही. तीन महिन्यांनंतर शेळीचे पोट वाढू लागते. तसेच शेळीचे वजन वाढलेले दिसून येते. शेळी गाभण झाल्यावर तिची त्वचा तजेलदार होते. शेळी गाभण आहे की नाही हे ओळखण्यासाठी नवीन पद्धतीमध्ये एक्सरे, सोनोग्राफी, लॅप्रोस्कोपी या तपासण्या खूपच विश्वसनीय मानल्या जातात. शेवटच्या गाभण काळात शेळीचा कास दुधाने भरलेला दिसून येतो.

### गाभण शेळ्यांचा आहार

- चांगल्या वजनाचे सशक्त करडू जन्मण्यासाठी गाभण काळामध्ये योग्य व्यवस्थापन करावे.
- गाभण शेळ्यांना वाळलेला ओला चारा, खुराक व खनिज मिश्रण यांचा पुरवठा योग्य प्रमाणात करणे आवश्यक आहे.
- गाभण शेळ्यांना सहज पचणारा चारा योग्य प्रमाणात पशुखाद्य द्यावे.
- गाभण काळातील शेवटचे किमान १ महिना विण्याच्या अगोदर समतोल आहाराचा पुरवठा करावा. गोठ्यातच फिरण्याची सोय असणे गरजेचे आहे.
- गाभणकाळात शेवटच्या ३ ते ४ आठवड्यामध्ये गर्भाशयातील पिल्लांचा उत्तम वाढीसाठी उत्तम प्रतीचा चाऱ्याबरोबरच दररोज २५० ते ३५० ग्राम खुराक द्यावा.
- स्वच्छ पाणी द्यावे. थंड पाणी किंवा पावसाचे पाणी देऊ नये त्यामुळे शेळी सर्दी सारखे आजार होऊ शकते.
- शक्यतो पावसाळ्यात गाभण शेळ्यांना सुका चारा द्यावा जसे की भरडलेला मका, गहू सोयाबीन यांचे मिश्रण करून द्यावे.



### गोठा व्यवस्थापन

गाभण शेळ्यांना इतरांपासून वेगळ्या जागी ठेवावे. गाभण शेळ्यांचा गोठ्यात उबदार वातावरण राहावे म्हणून साधारण २ ते ४ उंची पर्यंत १०० ते २०० पॉवरचे बल्ब लावावेत. रात्रीच्यावेळी गोठ्यात वाळलेले गवत, उसाचे पाचट अंथरावे जेणेकरून जमिनीतील गारवा व ओलसरपणा याचा गाभण शेळ्यांना त्रास होणार नही. गाभण असणाऱ्या शेळ्या बसण्याची जागा मलमूत्रामुळे ओली होते. अशा ओलसर ठिकाणी आठवड्यातून एक दोन वेळा चुन्याची भुकटी टाकावी. त्यामुळे गोठ्यात असलेले जिवाणू, विषाणू यांचा प्रादुर्भाव गाभण शेळ्यांवर कमी होतो.

### गाभण शेळ्यांना होणारे आजार-उपचार



गर्भपात, अंग बाहेर येणे, पोटफुगी, आंत्रविषार, बुळकांडी, अपचन, अशा प्रकारचे आजार उद्भवतात. पावसाळ्यात आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे शेळ्यांना श्वसनाचे आजार होण्याची दाट शक्यता असते. गोठ्यातील जमीन ओली असेल तर खुरांमध्ये ओलसरपणा राहून शेळ्यांचा खुरामध्ये जखमा होतात. पावसाळ्यात हिरवा ओला चारा जास्त प्रमाणात उपलब्ध असतो. त्यामुळे गाभण शेळ्यांमध्ये अंग बाहेर येणे हा आजार मोठ्या प्रमाणात आढळून येतो असे असल्यास पशुवैद्यकाकडून योग्य उपचार करून घ्यावेत.

## युरिया प्रक्रिया फायदेशीर

**उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाईमुळे हिरवा चारा मिळत नाही. अशा वेळी जनावरांना वाळलेल्या चाऱ्यावर अवलंबून राहावे लागते. पशुपालक जनावरांच्या आहारात दुय्यम घटकांचा (उदा. गव्हाचा पेंढा, भात पेंढा) जास्त वापर करतात. त्यामुळे आहाराची पौष्टिकता वाढवण्यासाठी युरिया प्रक्रिया महत्त्वाची ठरते.**

निकृष्ट चाऱ्यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण कमी आणि तंतुमय पदार्थ जास्त असतात. तसेच प्रथिने अत्यल्प असतात. त्यामुळे ती पचण्यास कठीण जातात. रवंथ करणारी जनावरे प्रथिने नसलेल्या नत्राचे प्रथिनात रुपांतर करू शकतात. ओलसरपणा आणि संप्रेरक युरियेज यांच्या उपस्थितीमध्ये युरियाचे विघटन होऊन अमोनिया आणि कार्बनडाय ऑक्साईड तयार होते. नंतर हा अमोनिया लिग्नीन हेमिसेलुलोज - सेलुलोज यांच्या बंधनावर (बॉन्ड) प्रक्रिया करून सेलुलोज हेमिसेलुलोज तयार करतो. त्यामुळे चाऱ्याची पचनक्षमता वाढते. तसेच युरिया प्रक्रिया केलेल्या चाऱ्याची चव बदलते, नत्राचे प्रमाण वाढते. त्यामुळे जनावरे चारा आवडीने खातात. युरियामध्ये नत्रा(नायट्रोजन)चे प्रमाण ४६ टक्के इतके असते. म्हणून युरिया हा नत्राचा अतिशय सहज व नियमितपणे उपलब्ध होणारा स्त्रोत आहे.

### युरिया प्रक्रियेचे फायदे

वाळलेल्या चाऱ्यामध्ये पचनास कठीण असलेले घटक, जसे की तंतुमय पदार्थ जास्त प्रमाणात असतात आणि प्रथिनांचे प्रमाणही खूप कमी असते. युरिया प्रक्रिया केलेल्या चाऱ्यामध्ये प्रथिनांचे प्रमाण १-१.५ टक्क्यापासून ३-४ टक्क्यापर्यंत वाढते आणि पचनीय क्षमता २०-३० टक्क्यांनी वाढते. चाऱ्याच्या पोषक घटकांमध्ये वाढ होते, त्यामुळे जनावरांच्या दूध उत्पादनातदेखील वाढ होते. जनावराची शारीरिक वाढ, प्रजनन क्षमता ही सुरळीत राखली जाते. अगदी कमी खर्चात व कमी वेळात जनावरांना पौष्टिक, सकस आहार उपलब्ध करून देता येतो.

### युरिया प्रक्रिया करण्याची पद्धत

गव्हाचा पेंढा, तांदळाचा पेंढा, उसाचे पाचट आदींचा आपण युरिया प्रक्रियेसाठी वापर करू शकतो. सर्वप्रथम चाऱ्याची कुट्टी करून घ्यावी. युरिया प्रक्रीयेसाठी कोरडी आणि सावलीतील जागा निवडावी. नंतर जमिनीवर पोते अंथरूण घ्यावीत, जेणेकरून खालच्या चाऱ्याला माती लागणार नाही. साधारणतः १०० किलो चाऱ्याकरिता ४ किलो युरिया वापरावा. प्रति १०० किलो चाऱ्याच्या प्रक्रियेसाठी ४ किलो युरिया ४० लिटर पाण्यामध्ये एकजीव मिसळून घ्यावा. त्यानंतर तयार झालेल्या द्रावणात एक किलो मिठ मिसळून एकजीव करावे. जमिनीवर टाकलेल्या पोत्यांवर चारा एकसारखा पसरून घ्यावा. साधारणतः ६ इंच इतका चाऱ्याचा थर करावा. नंतर पसरलेल्या चाऱ्यावर झारीच्या साह्याने तयार केलेले मिश्रण शिंपडावे आणि चारा हलवून एकजीव करून घ्यावा. अशा प्रकारे एकावर एक थर देऊन त्यात युरिया मिश्रण मिसळून घ्यावे. प्रत्येक थरात युरिया मिश्रण मिळून घेतल्यावर चाऱ्यावर दाब देऊन चाऱ्यातील जास्तीची हवा काढून घ्यावी. संपूर्ण चाऱ्यावर मिश्रण टाकून झाल्यावर त्यावर ताडपत्री किंवा प्लास्टिक कागदाने चारा हवाबंद करून झाकून टाकावा. चाऱ्यामध्ये बाहेरील हवा किवा पाणी जाणार नाही याची दक्षता घावी. २१ दिवस हा चारा हवाबंद ठेवावा. कारण यावर व्यवस्थित युरिया प्रक्रिया होते. २१ दिवसानंतरच हा चारा उघडावा.

### ही काळजी घ्या...

जनावरांना चारा खायला देण्यापूर्वी २-३ तास अगोदर चारा मोकळ्या हवेत ठेवावा. जेणेकरून त्यामधील अमोनिया गॅस हवेमध्ये उडून जाईल. राहिलेला चारा त्यानंतर पहिल्यासारखा हवाबंद करून ठेवावा. सुरुवातीला जनावरांच्या आहारात चारा थोड्या थोड्या प्रमाणात समाविष्ट करून हळूहळू मात्रा वाढवत न्यावी. १० दिवसांनंतर प्रक्रियायुक्त चारा ३-५ किलोपर्यंत जनावरांना देऊ शकतो. ६ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या वासरांमध्ये आणि रवंथ न करणाऱ्या जनावरांना हा चारा देऊ नये. युरियाचा वापर फक्त रवंथ करणाऱ्या जनावरांच्या आहारात करावा. ६ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या वासरांमध्ये आणि रवंथ न करणाऱ्या जनावरांच्या (उदा. घोडा, कुत्रा, डुक्कर) आहारात युरियाचा वापर करू नये.

### युरियामुळे होणारी विषबाधा

आहारात युरियाचा प्रमाणाबाहेर वापर झाला तर युरियाची विषबाधा होण्याची शक्यता असते. यामुळे जनावर दगावण्याचीदेखील शक्यता असते. जर जनावरांमध्ये अमोनियाचे प्रमाण १ मिलीग्रॅम प्रति १०० मिली रक्तापेक्षा जास्त झाले तर विषबाधा होते. तसेच गायी- म्हशीमध्ये ११६ ग्रॅम आणि मेंढीमध्ये १० ग्रॅमपेक्षा जास्त युरिया खाण्यात आला तर वेगाने जास्तीचा अमोनिया तयार होतो जो विषबाधेसाठी कारणीभूत ठरतो.

- लक्षणे : लाळ गळणे, पोटफुगी, पोटदुखी, हंबरणे, श्वासातून अमोनियाचा वास येणे, खुरे आपटणे, ओरडणे आदी तसेच २-३ तासांत मृत्यूदेखील होऊ शकतो.
- उपाय : युरियाची विषबाधा झाल्यास २० ते ४० लिटर पाणी जनावरांना द्यावे. त्यामुळे पोटातील युरियाची प्रक्रिया बंद पडते. पशुतज्ज्ञांकडून योग्य ते उपचार करून घ्यावेत.

## शॉर्ट न्यूज

### कोल्हार उपबाजारात गहू २७८६ रुपये क्विंटल

**राहाता :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक येथील उपबाजारात गव्हाची २१ क्विंटल आवक झाली. गहू कमीत कमी २४६२ रुपये तर जास्तीत जास्त २७८६ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. गहू सरासरी २६७५ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. तसेच कोल्हार उपबजारात ज्वारीची १४ क्विंटल आवक झाली. ज्वारी सरासरी २४७६ रुपये क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. सोयाबीनची ९ क्विंटल आवक झाली. सोयाबीन सरासरी ४३८० रुपये क्विंटल दराने खरेदी करण्यात आली.

### नितीन डुबल यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**श्रीगोंदा :** शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी श्रीगोंदा बाजार समितीचे संचालक नितीन डुबल यांची प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्या आदेशाने जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी निवड करत निवडीचे पत्र दिले. नगर येथे कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या कार्यकारिणीमध्ये श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राहुल जगताप यांचे निकटवर्तीय समजले जाणारे श्रीगोंदा बाजार समितीचे संचालक नितीन डूबल यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड आली.

### चित्रकला परीक्षेत गौतम पब्लिक स्कूलचे यश

**कोपरगाव :** शासकीय चित्रकला परीक्षांचा निकाल नुकताच जाहिर झाला असुन या स्पर्धेत गौतम पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. इलेमेंटरी चित्रकला परीक्षेत शाळेतील एकूण ११९ विद्यार्थी व इंटरमीजीएट परीक्षेस ५९ विदयार्थी प्रविष्ठ झाले होते. या परीक्षेत एकूण १७७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केलेले आहे. शाळेचा इलेमेंटरी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागलेला असून या परीक्षेत पवार ज्ञानेश्वर, देशमुख वैष्णवी रितेश ज्ञानेश्वर हे ०२ विद्यार्थीअ श्रेणीत तर ४५ विद्यार्थी ब श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहे.

### दुचाकीच्या डिक्कीतून ४० हजार लंपास

**श्रीरामपूर :** शहरातील स्टेट बँकेसमोर लावलेल्या दुचाकीच्या डिक्कीतून ४० हजार रुपयांची रक्कम अज्ञात चोरट्यांनी लुटली. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खैरी निमगाव येथील सतीश रामदास दुशिंग (वय ४०) यांनी फिर्याद दाखल केली. ते शहरातील स्टेट बँकेच्या मार्केट यार्ड शाखेसमोर दुशिंग यांनी त्यांची दुचाकी लावली होती. दुचाकीतील डिक्कीमधून चोरट्याने ४० हजार रुपये रक्कम व बँकेचे चेकबुक काढून घेत पोबारा केला.

### सारथी शिष्यवृत्ती सात विद्यार्थी चमकले

**तळेगाव दिघे :** येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील ७ विद्यार्थी - विद्यार्थिनींनी आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश संपादन केले आहे. सदर विद्यार्थी - विद्यार्थिनींना ४ वर्षापर्यंत दरवर्षी ९ हजार ५०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. सार्थक रावसाहेब जगताप, जान्हवी अमोल थोरात, अजिंक्य सोमनाथ जोंधळे, कल्याणी भारत खोकराळे, भक्ती चांगदेव अभंग, यशराज रामदास दिघे, वैष्णवी जगन्नाथ इल्हे या विद्यार्थी - विद्यार्थिनींनी सुयश संपादन केले.


# छगन भुजबळ यांना ठार मारण्याची धमकी

**■ नाशिकच्या कार्यालयात पत्र ■ ५० लाख रुपयांना दिली सुपारी**

**नाशिक : प्रतिनिधी**

**सध्या राज्यात गुंडाराज सुरू असून राज्यात एका पाठोपाठ एक गोळीबार होत आहे. अशा परिस्थितीत आता नाशिकमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. मंत्री छगन भुजबळ यांची पाच जणांना सुपारी दिली असून त्यांच्या जीवाला धोका असल्याचे पत्र त्यांच्या नाशिकच्या कार्यालयात आले आहे. छगन भुजबळ यांचा ठार करण्याची धमकी देण्यात आली आहे.**

मंत्री छगन भुजबळ यांच्या जीवाला धोका असल्याची खळबळजनक घटना समोर येत आहे. छगन भुजबळ यांना ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. तर या संदर्भातील एक पत्र छगन भुजबळ यांच्या नाशिकच्या कार्यालयात आलं आहे.



**पत्रात काय उल्लेख**

या पत्रात मंत्री छगन भुजबळ यांच्या जीवाला धोका असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी पाच जणांनी घेतल्याचा उल्लेखही या पत्रात करण्यात आला आहे. त्यासोबतच हे पाचही जण सध्या भुजबळांच्या शोधात आहेत. ते केव्हाही त्यांना जीवे मारू शकतात.

हे पाचही जण ज्यांनी भुजबळ यांची सुपारी घेतली आहे. ते सध्या गंगापूर दिंडोरी चांदशी येथील हॉटेलमध्ये बसून असल्याचेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे. या पाचही जणांना ५० लाख रुपयांना मंत्री छगन भुजबळ यांची सुपारी देण्यात आली आहे.

या गुंडांपासून भुजबळ साहेब तुम्ही सावध राहा, असा इशारा देण्यात आला आहे. एक मराठा लाख मराठा माफिया तुमचा गेम करणार असल्याचेही यामध्ये लिहीलेले आहे. हे गुंड रात्रभर छगन भुजबळ यांचा शोध घेत असल्याची माहिती आहे. या हल्ल्यासंदर्भातील मिटींग ही सागर हॉटेलमध्ये झाल्याचेही पत्रात सांगितले आहे. तर हे पत्र तुमचाच हितचिंतक शिंदे देशमुख या नावाने पाठवले आहे.

# मुळा लाभक्षेत्रातील थकीत पाणीपट्टी भरा

**अन्यथा पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा**

**राहुरी : प्रतिनिधी**



**मुळा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील बिगर सिंचन संस्थांनी पाणीपट्टीच्या रकमांचा नियमित भरणा न केल्याने मोठ्या प्रमाणात थकबाकीची रक्कम थकीत आहे. बिगर सिंचन ग्राहकांनी त्यांच्याकडील पाणीपट्टीची रक्कम रोखीने अथवा डिमांट ड्राफ्टने १५ फेब्रुवारीपर्यंत भरावे, अन्यथा कोणतीही पूर्व सूचना न देता पाणीपुरवठा खंडित करण्यात येईल, असा इशारा मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी दिला.**

जलसंपदा विभागाच्या मुळा पाटबंधारे विभागामार्फत ज्या पाणी पुरवठा योजनांना पाणी पुरविण्यात येते, त्यापैकी नगर महापालिका,बुऱ्हाणनगर व ४८ गावे पाणी पुरवठा योजना,महात्मा फुले कृषी विद्यापीठ, पांढरीपूल, नगर परिषद, राहुरी, नगर परिषद, देवळाली, बारागांव नांदूर व १४ गावे पाणी पुरवठा योजना आदी संस्थेकडे थकबाकी आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# समर्थ रामभक्ती

समर्थ रामदास. १७ वे शतक. मध्ययुगीन काळ. शिवकाळातले महान संत. श्रेष्ठ रामभक्त. त्यांच्या मनात आणि देहाच्या कणाकणात राम होता. प्रपंचातून परमार्थ साध्य करता येतो. नटखटासी नटखट, उध्दटासी उध्दट अशी शिकवण देणारे संत. वेळ पडल्यास धर्मरक्षणासाठी आपल्या देहातल्या वीर वृत्तीचा स्फुल्लिंग प्रज्वलित करणारे संत.



समर्थ श्रीराम भक्तीत इतके तन्मय झाले होते की विचारू नका! प्रभाते मनी राम चिंतीत जावा या श्लोकानेच त्यांची सकाळ सुरू होई. पंढरपूरचा श्रीविठ्ठल किंवा पंढरीनाथ हा कृष्णाचा श्रीरामाचाही अवतार. म्हणून समर्थ विठ्ठलालाच त्याच्या सन्मुख होऊन विचारतात,

**येथें उभा कां श्रीरामा। मनमोहना मेघश्यामा ।।धृ।।**
**काय केली सीताबाई। येथें राही रखुमाई ।।१।।**
**काय केली अयोध्यापुरी। तेथे वसविली पंढरी ।।२।।**
**काय केली शरयूंगंगा। येथें आणिली चंद्रभागा।।3।।**
**धनुष्यबाण काय केले। कर कटावरी ठेविले ।।४।।**
**काय केले वानरदळ। येथें मेळविले गोपाळ ।।५।।**
**रामी रामदासीं भाव। तैसा होय पंढरिराव ।।६।।**

हे मनमोहना, मेघ:श्यामा, श्रीरामा, तू येथे नुसता उभा काय राहिला आहेस? हे काय करतो आहेस? इथे तुझ्या शेजारी सीतेऐवजी रखुमाई आहे. इथे तू पंढरपूर नगरी वसविली आहेस. मग अयोध्यापुरी कुठे आहे? इथे चंद्रभागा नदी आणलेली दिसते. शरयू किंवा गंगा नदी दिसत नाही. हातात धनुष्यबाण बाळगण्याऐवजी तू साक्षात् हात कमरेवर ठेवून मख्ख उभा आहेस. तुझ्या हातातले धनुष्यबाण काय झाले? तुझ्याजवळचे वानरसैन्य दिसत नाही ते? इथे तर तू भक्त आणि सवंगडी अशा गोपाळांच्या गोतावळ्यात रमला आहेस. समर्थ श्रीराममय झाल्याने त्यांना पंढरीनाथाच्या ठिकाणी श्रीरामच दिसत असल्याने हा प्रकार झाला!

**नाना ढवळे** ८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

# गोपीचंद पडळकरांकडून नव्या संघटनेची घोषणा

**भाजपवर नाराज असल्याच्या चर्चा**

**सांगली : प्रतिनिधी**

**भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी नव्या संघटनेची स्थापना केली. सांगली जिल्ह्यात त्यांनी संघटनेच्या २५ शाखांचे उद्घाटन केले. त्यामुळे पडळकर भाजपवर नाराज आहेत का?अशी चर्चा होऊ लागली. यावर गोपीचंद पडळकरांनी आपण पक्षावर नाराज नाही, माझ्या नेतृत्वाचा माझ्यावर विश्वास आहे असं स्पष्ट सांगितले आहे.**

आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले की, मी गेल्या १०-१५ वर्ष राजकीय, सामाजिक चळवळीत आहे. महाराष्ट्रभर दौरे करताना अनेक युवकांचे म्हणणं होतं, तुम्ही संघटना काढावी. त्या संघटनेच्या माध्यमातून आम्हाला काम करता येईल. युवकांना जोडता येईल. त्यामुळे युवकांची मागणी लक्षात घेता हिंदुस्थान शिव मल्हार क्रांती सेना ही संघटना मी काढली आहे. त्या संघटनेच्या २५ शाखांचे उद्घाटन आम्ही केलंय. युवकांचा खूप उस्फुर्त प्रतिसाद मिळतोय असं त्यांनी सांगितले. तसेच गावगाड्यातील उपेक्षित वंचित, पीडित युवक आहेत. त्या सगळ्या समाजाच्या युवकांना एकत्रित करायचे आणि प्रस्थापितांविरोधात लढा द्यायचा, विस्थापितांना मानाचे सिंहासन मिळवून द्यायचे यासाठी संघटनेची स्थापना केली, असे ते म्हणाले.

पडळकर पुढे म्हणाले की, या माध्यमातून राज्यभरात हजारो शाखा येत्या काही महिन्यात स्थापन होतील. मी जरी भाजपचा सदस्य असलो तरी आम्ही अराजकीय संघटना स्थापन केली. कुठल्याही पक्षातील, विचारधारेतील युवक आमच्या संघटनेत काम करू शकतो. अराजकीय संघटना स्थापन करायला काहीच हरकत नाही. संघटना काढण्याचा हेतू म्हणजे युवकांना व्यासपीठ मिळत नाही. त्यामुळे या संघटनेच्या माध्यमातून युवकांना व्यासपीठ दिले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यातून युवक संपर्क साधत आहेत. युवकांची बांधणी करून एक मजबूत संघटना तयार होईल. गावातील प्रत्येक प्रश्नाला वाचा फोडण्याचं काम संघटनेच्या माध्यमातून केले जाईल.

**WALK-IN-INTERVIEW**

SHREE BABANRAO NARAYAN DHOKALE SHIKSHAN V SANSHODHAN SANSTHA PUNE

**ADARSH GROUP OF INSTITUTES**

Khadakwadi, Tal. Parner, Dist. Ahmednagar,

| Sr.No. | Post | Subject | No. of Posts |
|---|---|---|---|
| 1 | M.Sc. Bed | Chemistry, | 2 Post each |
| | | Biology | 2 Post each |
| | | Mathematics | 2 Post each |
| 2 | M.A.Bed | English | 2 Post each |
| | | Geography | 2 Post each |
| | | Marathi | 2 Post each |
| | | SST | 2 Post each |
| 3 | B.Sc.Bed | Science | 2 Post each |
| | | Mathematics | 2 Post each |
| 4 | D.Ed. | English Medium | 2 Post each |
| | | Marathi Medium | 2 Post each |

Date & Time of interview: Monday, 12 th Feb 2024. 11:00 am. To 03.00 pm.

- Place of interview -

ADARSH GROUP OF INSTITUTES,
Khadakwadi, Tal. Parner, Dist. Ahmednagar, 414304.

Contact Details: 7887882535, E-mail.:director@shreebndhokaletrust.com

Secretary Chairman
Shree Babanrao Narayan Dhokale Shikshan V Sanshodhan Sanstha Pune
A/P.Khadakwadi, Tal.Parner, Dist.Ahmednagar

# योगेश तपस्वींच्या भजन संध्येत भक्तजण तल्लीन

**राजाभाऊ कोठारींच्या वाढदिवसाचे औचित्य**

**नगर : प्रतिनिधी**

**येथील मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने एमआयडीसीच्या मंगल दत्त क्षेत्रात राजाभाऊ कोठारी(श्री विश्वेश्वर स्वामी महाराज)यांचा वाढदिवसा निमित्त कमलाकर काका तपस्वी यांचे पुतणे सन्मित्र वृंद पुणेचे योगेश तपस्वी यांची भजन संध्या संध्याकाळी झाली.**




यावेळी राजाभाऊ कोठारी(श्री विश्वेश्वर स्वामी महाराज) यांच्यासह मोठ्या संख्नेने भाविक व श्रोता वर्ग उपस्थित होता यामध्ये गायक योगेश तपस्वी यांनी शंकर महाराज, श्री स्वामी समर्थ यांच्या वरील मराठी हिंदी भजने सादर केली कार्यक्रमाचा प्रारंभ गणपतीच्या गाण्याने तर सांगता मै गया नही,जिंदा है या शंकर महाराजांच्या गीताने केली

या सत्संग भजन कार्यक्रमात त्यांना हार्मोनियम-उदय शहापूरकर,तबला-पद्माकर गुजर,ढोलक-प्रतीक गुजर तालवाद्य-अशोक ससाणे,हृतिक गुजर यांनी साथ दिली कार्यक्रम शेवटपर्यंत रंगत गेला.

**Hero** **जागा भरणे आहेत**

- वर्कशॉप सुपरवायझर (ऑटो डीप्लोमा) : 2 जागा
- स्पेअरपार्ट एक्झीक्युटीव्ह (12 वी पास) : 1 जागा
- वॉशिंग बॉय (10 वी पास) : 2 जागा
- मेकॅनिक (आयटीआय) : 2 जागा
- सेल्स/गोडाऊन एक्झीक्युटीव्ह (ग्रॅज्युएट) : 2 जागा
- अकाऊंट एक्झीक्युटीव्ह (बी.कॉम) : 2 जागा
- कम्प्युटर ऑपरेटर (कॉम्प्युटर कोर्स पास ) : 2 जागा
- कॅशियर (बी.कॉम) : 2 जागा
- कॉलिंग एक्झीक्युटीव्ह (12 वी पास) : 2 जागा

**दिग्विजय मोटर्स** ऑथोराईज्ड डीलर - हिरो मोटोकॉर्प लि.
9890335070 9028015644, 9028015641
भास्कर आयकॉन, पुणे-नगर बायपास रोड, विघ्नहर्ता हॉस्पिटल जवळ, बाबुराव नगर, शिरुर.
शोरूम, नगरकडे, थिटे कॉलेज, बाबुराव नगर, पुणे -नगर हायवे, शिरुर शहर, रिलायन्स पेट्रोल पंप

# बारा मतदारसंघात होणार २२ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**जिल्ह्यात ३७३४ मतदान केंद्र**

**नगर : प्रतिनिधी**

**येत्या लोकसभानिवडणुकीसाठी निवडणूक आयोगाचीतयारी सुरू झाली आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आयोगाकडून मतदार यादीही प्रसिद्ध झाली असून निवडणुकीसाठी नगर जिल्ह्यात बारा विधानसभा मतदारसंघात सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक विभागाने दिली.**



यंदा लोकसभा निवडणूक एप्रिल, तर विधानसभा निवडणूक ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होईल.जिल्ह्यात शिर्डी व अहमदनगर या दोन लोकसभा मतदारसंघासाठी एकूण ३७३४ मतदान केंद्रांना केंद्रीय निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे. यात नगर शहरात २८६ मतदान केंद्रांचा समावेश आहे. जिल्ह्यातीलएका मतदान केंद्रावर एक मतदान केंद्रप्रमुख, तीन बूथ कर्मचारी, एक शिपाई असे पाच कर्मचारी असतील. याशिवाय पोलीस बंदोबस्त वेगळा असणार आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
**स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये**
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

**डॉ. सुलभा पवार**
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

- प्रसूती विभाग
  - प्रसूती पूर्व तपासणी
  - संपूर्ण प्रसूती उपचार
  - अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
- गर्भपिशवीचे आजार
  - अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
  - गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
  - गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
- Infertility वंधत्व उपचार
  - वारंवार होणारे गर्भपात,
  - लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
  - पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
  - टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
- स्तनांचे आजार आणि उपचार
- PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
- सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे (म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
**न्यु सह्याद्री अकॅडमी**
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST | MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर

**आमची वैशिष्ट्ये**
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर

ॲडमिशन ओपन

9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांचे काम विकासाभिमुख

■ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे ■ जि.प.माजी सभापती काशिनाथ दाते



(छाया : संदीप इधाटे)

**निघोज : प्रतिनिधी**

**राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून पारनेर तालुक्यात सुद्धा या पाच वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे देउन पारनेर तालुका विकासाभिमुख करण्याचे काम विखे पाटील यांनी केले असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सभापती काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले आहे.**

पारनेर तालुक्यातील वडनेर येथील सभामंडप कामाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी ते बोलत होते. नामदार विखे पाटील यांच्या माध्यमातून २० लक्ष रुपये निधी उपलब्ध झाला आहे. भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, पंचायत समितीचे सदस्य दिनेश बाबर, वडनेरचे सरपंच राहुल सुकाळे, सैनिक सहकारी बँकेचे संचालक शिवाजी सुकाळे, खरेदी विक्री संघाचे संचालक भाऊसाहेब मेचे, सोसायटीचे चेअरमन दिलीप चौधरी, व्हा . चेअरमन खंडू बोचरे, माजी चेअरमन अनंथा जगदाळे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष लक्ष्मण बोऱ्हाडे, माजी सरपंच शिवा पवार, रामदास चौधरी, शिवाजी चौधरी, बाळासाहेब चौधरी, भाऊसाहेब बाबर, दादाभाऊ थोरात, जालिंदर येवले, विश्वनाथ येवले, गंगादादा पवार, दत्तात्रय मेरगळ, अशोक वायदंडे, भाऊसाहेब बाबर, काशिनाथ वाजे, रामदास सुकाळे, राहुल बाबर, संतोष पवार, रमेश वाजे , अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार तसेच वडनेर परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी सभापती दाते सर यावेळी म्हणाले नामदार विखे पाटील हे राज्याचे नेते आहेत राज्यातील विविध भागात त्यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. राज्याचे ज्येष्ठ मंत्री म्हणून काम करताना त्यांनी महसूल खात्याचे मंत्री म्हणून आगळा वेगळा ठसा उमटविला असून महसूल खाते कार्यक्षम करण्याचे काम त्यांनी केले असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील यावेळी म्हणाले वडनेर गावचे सरपंच राहुल सुकाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. ही कामे करताना संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी अळकुटी - निघोज जिल्हा परिषद गटातील सरपंच, उपसरपंच व विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना मोठ्या प्रमाणात विकासकामांचे पाठबळ देत गेली पाच वर्षात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत माध्यमातून विकासकामांचा डोंगर उभा केला असून अशाप्रकारे नेतृत्व करण्याचे काम त्यांनी केले असल्याचे प्रतिपादन शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यावेळी म्हणाले नामदार राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ सुजय विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी आम्हाला भरभरून विकासकामे दिली आहेत. या भागातील रस्ते, विज, आरोग्य,पाणी हे प्रश्न चुटकीसरशी सुटतात याला पाठबळ विखे घराण्याचे असल्याने या प्रश्नांची सोडवणूक सातत्याने होत असते. विकासकामांबरोबरच सामाजिक कामांच्या माध्यमातून विखे पाटील यांनी तालुक्यातील जनतेला भरभरून दिले असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. सरपंच राहुल सुकाळे यांनी प्रास्ताविक भाषणात या भागातील विकासकामांची माहिती दिली.

# विद्याधाम प्रशालेचा चित्रकला परीक्षेचा शंभर टक्के निकाल

५४ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी प्राप्त



**सुपा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री.संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेचा शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून ५४ विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणी प्राप्त केली आहे.**

एलिमेंटरीमध्ये सायली घेगडे, श्रावणी पवार , दिव्या शिंदे ,ओम कळसाईत ,सर्वेश वाकचौरे या विद्यार्थ्यांनी अ श्रेणी प्राप्त केली तर अनुष्का भगत,भक्ती बोबडे, कोमल बोरगे ,समीक्षा धोत्रे,गौरी घेगडे, आर्या कोठाळे,वैष्णवी कौठाळे ,करिष्मा खेडकर,श्रावणी नरके,वैभवी पिलाने ,ज्ञानेश्वरी राऊत ,गीता राऊत ,संध्या तिवारी ,मृणाल वाघमारे,साक्षी वाघमारे,तन्वी वाघमारे,ओम अलभर,रोहन अलभर,अथर्व बनकर ,कौशल बनकर,सार्थक भोंडवे,देवेंद्र ओहोळ,या विद्यार्थ्यांनी बश्रेणी प्राप्त केली.

इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेत सोनाली आढाव,कोमल बनकर ,पायल बनकर,श्रावणी बनकर, वैष्णवी बनकर,अनुष्का घेगडे, साक्षी घेगडे,साक्षी रो.घेगडे समीक्षा घेगडे,श्रावणी कौठाळे,साधना कोरके,अमोल बोरगे,साहिल कोरके या विद्यार्थ्यांनी अ श्रेणी प्राप्त केली तर श्रद्धा बनकर,योगिता बनकर,तनिष्का ढवळे,स्नेहल गवारे,समृद्धी गुंजाळ, चैताली जाधव,प्रणाली कोकाटे ,कोमल कोळपे,चैताली मोटे,साक्षता मोटे,समीक्षा पटेकर,स्नेहल शेळके,प्रतीक गायकवाड,सिद्धार्थ मोहिते,या विद्यार्थ्यांनी ब  श्रेणी प्राप्त केली.या सर्व विद्यार्थ्यांना कलाध्यापक संदीप वेताळ यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल बोरा , सचिव नंदकुमार निकम ,शाळा समितीचे अध्यक्ष चंदूलाल चोरडीया, मुख्याध्यापक बाळासाहेब दहिफळे , पर्यवेक्षक बाळशिराम डोके यांनी अभिनंदन केले आहे.

# पारनेर महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थिनींचे काव्यवाचन स्पर्धेत यश

अंजुम इनामदार जिल्ह्यात प्रथम

**पारनेर : प्रतिनिधी**



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कोपरगाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धेमध्ये पारनेर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या तीन विद्यार्थिनींनी यश संपादन केले आहे.**

स्वयंसेवकांनी शिवानी संतोष रामफळे (इंग्रजी भाषा), योगिता खंडू तारडे (मराठी भाषा) आणि अंजुम सलीम इनामदार (हिंदी भाषा) आपली स्वरचित कविता सादर केली. या जिल्हास्तर काव्यवाचन स्पर्धेत शिवानी संतोष रामफळे हिस द्वितीय क्रमांक आणि अंजुम सलीम इनामदा हिस प्रथम क्रमांक मिळाला आहे.

याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थिनीचे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे , सचिव जी.डी.खानदेशे व  सर्व पदाधिकारी यांनी संस्थेतर्फे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ.तुकाराम थोपटे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, कार्यालयीन अधीक्षक सावकार काकडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. महेश आहेर, डॉ. हनुमंत गायकवाड, डॉ. माया लहारे, सर्व शाखाप्रमुख, विभागप्रमुख आणि विद्यार्थी आणि विद्यार्थिनी स्वयमसेवकांतर्फे  खूप कौतुक आणि अभिनंदन  केले आहे.

# झेड.पी.समोर आत्मदहनाचा ग्रामसेवकाचा इशारा

■ पारनेर पंचायत समितीचा भोंगळ कारभार
■ अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून सापत्न भावाची वागणुक

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**पारनेर पंचायत समितीचे तत्कालिन गटविकास अधिकारी व आस्थापना लेखणीक यांनी मागासवर्गीय असल्याचा रोष मनात ठेवून जाणीवपुर्वक त्रास दिला पुर्वसुचना न देता वेतन थांबविले थकीत वेतन मिळून संबंधितावर गुन्हे दाखल व्हावे या मागणीसाठी ग्रामसेवक संदिप रमेश माळी यांनी १५ नोव्हेंबरला जिल्हा परिषदेसमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.**

याबाबत त्यांनी आपल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, मी आदिवासी समाजाचा असून गटविकास अधिकारी व आस्थापणा लेखणीक यानी मला कोणतीही पुर्वसुचना न देता माझे वेतन थांबविले वेतन काढण्यासाठी पैशाची मागणी केली व जाणीवपुर्वक राजकीय दृष्ट्या अतीसंवेदनशिल गावात पात्रता नसताना नेमणुक देणे असा त्रास दिला. माझी मुलगी आजारी असताना पैशाअभावी उपचार करता आला नाही. माझ्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आणि म्हणून १० फेब्रुवारी २४ च्या अर्जानुसार तत्कालिन गटविकास अधिकारी किशोर माने व अस्थापणा लेखणीक यांच्यावर गुन्हे दाखल व विभागीय चौकशी होऊन मला न्याय मिळावा म्हणून आपण आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. या आंदोलनामुळे पारनेर पंचायत समिती प्रशासनात खळबळ उडाली आहे.

(पान १ वरुन)

## अण्णांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्यांना धडा शिकवा

एकजूट दाखवली असून गावागावातून मिळणारा वाढता पाठिंबा, सभासदांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया, चेअरमन यांनी केलेला भ्रष्टकारभारचा विचार करता बँकेत परिवर्तन होणार ही दगडावरची रेघ आहे. दादासाहेब रसाळ, माजी संचालक सैनिक बँक

**परिवर्तन अटळ**

बँकेत एकतर्फी कारभार रोखण्यासाठी रविवारी सर्व सभासद संस्थेत परिवर्तन करून लोकशाही आणतील, असा ठाम विश्वास आहे. किसन (नाना) ठुबे माजी संचालक सैनिक बँक

घोटाळेबाजाला बँकेपासून दूर ठेवा

सैनिक बँकेच्या उन्नतीच्या बातम्या येयाला हव्या होत्या पण सतत घोटाळ्याची, गुन्हाच्या बातम्या प्रसारमाध्यमात आल्या असून अशा घोटाळेबाज चेअरमनला बँकेच्या सत्तेपासून दूर ठेवा कॅप्टन विठ्ठल वराळ

**घरचा रस्ता दाखवा**

अनेक वर्षांपासून ठाण मांडलेल्या चेअरमनला घरचा रस्ता दाखविणे आवश्यक आहे. जनतेच्या पैशाची लूट थांबविण्यासाठी परिवर्तन  पॅनलला विजयी करा.

अरुण रोहोकले,  माजी संचालक

# स्व.गंगाराम भनगडे (मेजर)
# देशभक्ती जपणारा निष्काम कर्मयोगी



पारनेर तालुक्यातील भनगडेवाडी या बोटावर मोजण्याइतके घरे असणाऱ्या छोट्याशा खेड्यात रंभाबाई व धोंडीबा भनगडे या दांपत्यांच्या पोटी १ जून १९४८ रोजी गंगाराम धोंडीबा भनगडे (मेजर) उर्फ नाना यांचा जन्म झाला. कुटुंबातील अठराविश्व दारिद्र्य, पाचवीला पुजलेला दुष्काळ, एका वेळच्या अन्नाची भ्रांत  त्यात चार भाऊ आणि दोन बहिणी परंतु गावातील सुसंस्कृत स्वाभिमानी आणि तितकेच कष्टाळू असे हे भनगडे कुटुंब. अशा या कौटुंबिक परिस्थितीत नानांनी आपले दहावीपर्यंतचे शिक्षण कसेबसे पूर्ण केले. इयत्ता चौथी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषद शाळा भनगडेवाडी या ठिकाणी तर दहावीपर्यंतचे माध्यमिक शिक्षण हे दुर्गादेवी विद्यालय ढवळपुरी या ठिकाणी कमवा आणि शिका या योजनेतून पूर्ण केले.

परिस्थितीच्या या विळख्यातून बाहेर पडायचे असेल तर थांबून चालणार नाही पैशाअभावी अकरावी प्रवेश घेता आला नसला तरीही निराश न होता आपण आपलेच लढायचे या जिद्दीने नाना पेटून उठले. वाट खर्चीला पैसे नसतानाही कसाबसा प्रवास करून नाना थेट बेळगावला पोहोचले आणि १५ डिसेंबर १९६७ रोजी भारतीय लष्करात भरती झाले आणि त्यांच्या जीवनातील एका नवीन अध्ययाला सुरुवात झाली.  भनगडेवाडी आणि आजूबाजूला असणाऱ्या वाड्या वस्त्यावरील लष्करात भरती होणारे गंगाराम भनगडे पहिलेच जवान ठरले त्यामुळे लोकांना त्यांचे फार कुतूहल वाटत असे. सुट्टीला आल्यावर सैन्यातील गमतीजमती आणि आठवणीचे प्रसंग ते नेहमी सांगत असत तर गावातील तरुण देखील अतिशय उत्साहाने त्यांचे अनुभव ऐकण्यासाठी गावातल्या चावडीजवळ जमत असे. जम्मू काश्मीर, आसाम, लेह- लडाख,द्रास, सियाचिन यासारख्या बर्फाच्छादित आणि अवघड क्षेत्रात नानांनी अनेक वर्ष आपल्या देश सेवेची घालविली.



**कर्तृत्वाची प्रचिती : अंत्यविधी प्रसंगीचा जनसमुदाय**

अगदी तुटपुंज्या पगारावर सुरुवात केलेल्या नोकरीत नानांना खूप तारेवरची कसरत करावी लागत असे. पुढे भाळवणीतील सुसंस्कृत आणि अतिशय कष्टाळू कुटुंबातील नामदेव चेमटे यांच्या कन्या शारदाबाई यांच्याशी सन १९७४ साली मेजर साहेबांचा विवाह पार पडला आणि खऱ्या अर्थाने जीवनाच्या दुसऱ्या अध्यायाला सुरुवात झाली. नाना दूर देशी सीमेवर काम करत असताना संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी शारदाताईनी अतिशय यशस्वीपणे पार पाडली. सुरेखा, आशा  आणि उज्वला या तीन मुली तर संतोष हा मुलगा या चारही अपत्यांचा दिनक्रम त्यांचा अभ्यास आणि थेट त्यांच्या उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व बाबी आणि त्यात शेती हे नानांच्या साथीने शारदाताईनी यशस्वीरितिने सांभाळल्या आणि एका आदर्श कुटुंबाची कोनशिला उभी केली.

सन १९८७  साली उत्तर श्रीलंकेत निर्माण झालेल्या अशांततेसाठी भारतीय लष्करातून पाठविण्यात आलेल्या शांती सेनेचे गंगारामजी भनगडे मेजर(नाना)प्रतिनिधित्व करत होते. श्रीलंकेत हैदोस घातलेल्या एल टी टी ई या अतिरेकी संघटने बरोबर प्रत्यक्षात युद्ध करण्याचा प्रसंग नाना आणि त्यांच्या तुकडीला आला. काही तास चाललेल्या या चकमकीत भारतीय सैन्याच्या अनेक जवानांना वीरमरण आले तर नानांच्या खिशात असणाऱ्या पदकाच्या बिल्ल्यावर गोळी आदळून ती डाव्या हाताला चाटून गेली आणि नाना थोडक्यात बचावले. पण या प्रसंगानंतर नाना नेहमी म्हणत असत माझ्या साथीदारांबरोबर मलाही वीरमरण आले असते तर बरे झाले असते कारण मी ही भारतीय लष्कराच्या इतिहासात अमर झालो असतो इतके भारतीय लष्कर आणि देश सेवेचे प्रेम नानांच्या नसानसात भरलेले होते.

वीस वर्ष अविरत भारत मातेची सेवा करून सन १९८८साली नाना देश सेवेतून कार्यमुक्त झाले पण नानांच्यातील जवान त्यांना स्वस्त बसू देत नव्हता. सेवा निवृत्त नंतर झालेल्या जवानांच्या पेन्शन साठीची ओढाताण आणि आर्थिक अस्थिरता यामुळे ते बेचैन होत असे.अशातच पारनेर तालुक्याचे भाग्यविधाते ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांच्या विचारांबरोबर आणि प्रत्यक्षात त्यांच्यासोबत काम करताना एक वैचारिक नाळ नानांची जुळली. पारनेर तालुक्यातील माजी सैनिकांचे एक भक्कम संघटन उभे करण्यात अण्णासाहेब हजारे यांच्याबरोबर नानांनाही यश आले आणि त्यातूनच सन १९९५ साली पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेची स्थापना झाली. या बँकेत नानांनी संस्थापक संचालक म्हणून दहा वर्ष सेवा बजावली आणि त्या माध्यमातून अनेक माजी सैनिकांशी संपर्क वाढवून त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.

१९९९ च्या कारगिल युद्धाप्रसंगी भारतीय सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी भाळवणी आणि परिसरातून अनेक निधी संकलन व प्रभात फेऱ्या निघाल्या यात नाना सक्रिय सहभागी होते. त्यावेळी महात्मा फुले विद्यालयाच्या प्रभात फेरीची सांगता गंगाराम भनगडे मेजर अर्थात नाना यांच्या भाषणाने झालेली आणि त्यांच्या त्या रोमहर्षक बोलण्याने प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रूत तराळलेले आजही मला आठवणीत आहे.नानांनी देशासाठी केलेल्या सेवेबद्दल  भनगडेवाडी ग्रामस्थांनी नानांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी सन २०१६ साली ढवळपुरी आणि परिसरातील सर्व माजी सैनिकांचा मेळावा आयोजित केला होता त्यात नाना अध्यक्षस्थानी होते कारण नाना म्हणजेच भनगडेवाडी  गावातील पहिले जवान म्हणून गावाला एक सर्वस्वी अभिमान होता.

कौटुंबिक परिस्थिती बाबत नाना नेहमी खुश असत कारण त्यांच्या विश्वासावर पत्नी शारदाताई यांनी उभ्या केलेल्या आदर्श कुटुंबाच्या





**होता सोन्याचा संसार ! आपल्या सुखी परिवारासोबत स्व.नाना**

कोनशिलेत कन्या सुरेखा हिचे पती बाबासाहेब झावरे हे पेशाने डॉक्टर आहेत, दुसरी कन्या आशा ही स्वतः शिक्षिका असून पती अशोक गागरे हेही आदर्श शिक्षक आहेत तर तिसरी कन्या उज्वला हिचे पती अंकुशराव रोहोकले हे पारनेर तालुक्यातील ख्यातनाम वकील आहेत. चिरंजीव संतोष यांचा तर नानांना नेहमीच अभिमान वाटत असे कारण नाना संस्थापक संचालक राहिलेल्या पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेत ते वरिष्ठ पदावर कार्यरत असून कायम बँकेत येणाऱ्या माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यात ते व्यस्त असतात. तसेच आपल्या सोबतच्या वर्ग मित्रांच्या सहकार्याने आणि मित्रांचेही आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याच्या हेतूने  त्यांनी भाळवणी ग्रामीण पतसंस्थेची स्थापना केली आहे जी आज २० कोटी रुपयांच्या ठेवींनी परिपूर्ण आहे . महात्मा फुले विद्यालयातील माजी माजी विद्यार्थ्यांचे मेळावे घेणे, त्यातून अडचणीत असणाऱ्या सहकारी बांधवांना सहकार्य करणे, रक्त शिबिर राबविणे यासारखे नवनवीन प्रयोग राबविण्यात संतोष कायम आघाडीवर असतात. त्यामुळेच त्यांनी भाळवणी आणि परिसरात अफाट मित्रपरिवार निर्माण केला आहे.सतत नवीन उद्योगाची जाण असणाऱ्या संतोष यांनी नगर कल्याण हायवे वरती स्वाद महाराष्ट्राचा हे अल्पावधीतच अनेकांना भुरळ घालणारे हॉटेल सुरु करून त्याचे उद्घाटन नाना आणि अक्का (शारदाताई) यांच्या हस्ते करून आपल्या अनुभवाची चुणूक दाखवली आहे. त्यामुळे नानांना संतोष यांचे कार्य बघून आपले जीवन सार्थ लागल्याचे समाधान वाटत असे. आणि नाना ते बोलून देखील दाखवत असे की, माझा संतोष म्हणजेच माझे समाधान आहे.  नानांच्या शेवटच्या आजारपणात देखील चिरंजीव संतोष आणि सुनबाई जया यांनी अगदी मुलीप्रमाणे  तन मन धनाने त्यांची सेवा केली. पुतणे बाळासाहेब भनगडे (चेअरमन), निवृत्ती आणि युवा उद्योजक- संतोष भनगडे यांचा देखील नानांना सार्थ अभिमान वाटे आणि ते नेहमी म्हणत असत की माझ्या परिवाराने शून्यातून विश्व उभे केले आहे.

असा हा शांत, शीतल आणि तेजोमय तारा 3 फेब्रुवारी रोजी आपल्या सर्वांतून निखळला आहे. नाना जरी आज आपल्यात नसले तरी नानांचे विचार चिरकाल जिवंत ठेवण्याचा आम्ही सदैव प्रयत्न करू.

जाता जाता विंदा करंदीकरांच्या पंक्तीत एवढेच म्हणावेसे वाटते-

असे जगावे दुनियेमध्ये आव्हानांचे लाऊनी अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर

पारनेर दर्शन परिवार आणि वाचकांकडून नानांना भावपूर्ण आणि अखेरचा दंडवत.

गणेश ठोकळ
९५५२०५२३८२

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com